# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- भिवंडी पूर्व मतदार संघातील विविध ठिकाणी पाण्याची पाईप लाईन टाकणे बाबत.**
(नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधेची कामे करणे (महानगरपालिका) या योजने अंतर्गत)

भिवंडी पूर्व मतदार संघातील विविध ठिकाणी पाण्याची पाईप लाईन टाकणे कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ९९,९९,०००/- मात्रच्या प्रस्तावास मा.जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांजकडील प्रशासकीय मंजुरी आदेश जा.क्र./जिनिस/नास्थास्वसं/का-२/रा.वि/२३-२४/१६३४ दि.१८/०७/२०२४ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामाची रक्कम रु. ९९,९९,९८८/- मात्र आहे. तरी ई-निविदा सुचना क्र.०८/२०२४-२५ (१०६२६३०) नवभारत टाईम्स, महाराष्ट्र टाईम्स व इकॉनोमिक्स टाईम्स या वर्तमानपत्रात दिनांक ३१/०७/२०२४ रोजी जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या (www.mahatenders.gov.in) संकेतस्थळावर दि.३१/०७/२०२४ रोजी प्रसिध्द करुन ब-१ प्रकारची ई-निविदा मागविणेत आली असता सदर कामासाठी एकुण ५ निविदा प्राप्त झाल्या आहेत. परंतु दोन निविदाकारानी आवश्यक त्या कागदपत्राची पुर्तता न केल्याने त्यांचे आर्थिक देकार उघडण्यांत आले नाही. उर्वरीत तीन निविदाकारानी आवश्यक असलेल्या कागदपत्राची पुर्तता केल्याने निविदा समितीच्या छाननी अंती प्रस्तुत कामी ३ पात्र निविदा खालील प्रमाणे प्राप्त झाल्या आहेत.

| अनु क्रं. | निविदाकारांची नावे | निविदेतील दर |
|---|---|---|
| १ | मे.विंध्या ट्रेडर्स | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.० टक्के जास्त दराने |
| २ | मे. संदेश बुताला | अंदाजपत्रकिय दरापेक्षा १५.० टक्के जास्त दराने |
| ३ | मे.जयहर्ष विजय भदाणे | अंदाजपत्रकिय दरापेक्षा १९.० टक्के जास्त दराने |

वरीलपैकी मे. विंध्या ट्रेडर्स, रा. अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ९३. यांची निविदा कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरांपेक्षा ३.० टक्के जास्त दराची असल्यामुळे जा.क्र.भिनिशमनपा /पापुवि/११६१/२०२४ दि.०४/०९/२०२४ रोजीच्या पत्रान्वये वाटाघाटी करण्यात आली असता वाटाघाटीच्या चर्चे अंती मे. विंध्या ट्रेडर्स हे सदरचे काम अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच रु. ९९,९९,९८८/- मात्रने करणेस तयार आहे. तरी सदर रक्कमेच्या खर्चाची निविदा संविदा करणेकामी प्रस्तावास कार्यकारी अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांची मान्यता मिळाली असुन ई निविदेतील कमी दराला प्रशासकीय मंजूर मिळणेबाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकीय ठराव क्र.:-** ५६५ **दिनांक :-** १६/०९ /२०२४

मे. विंध्या ट्रेडर्स, रा. अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ९३. यांची अंदाजपत्रकिय दराने म्हणजेच रक्कम रु.९९,९९,९८८/- (अक्षरी- नव्याण्णव लाख नव्याण्णव हजार नऊशे अठयाएंशी मात्र) ची निविदा मंजुरीस कार्यकारी अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच

अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशाराक तथा आयुक्त, भिवंडी पूर्व मतदार संघातील विविध ठिकाणी पाण्याची पाईप लाईन टाकणे (नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधेची कामे करणे (महानगरपालिका) या योजने अंतर्गत) कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये निविदेतील दरांना मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)

**प्रशासक तथा आयुक्त**

**भिवंडी नि.श.महानगरपालिका,भिवंडी.**

O/C